**परदेशात वास्तव्य करणाऱ्या नजीकच्या नातलगांकडून कर्जाची उभारणी**
**ए. पी. (डी. आय आर सेरीज) परिपत्रक सं २४ (२७ सप्टेंबर २००३)**

**भारतीय रिझर्व्ह बँक**
**विदेशी मुद्रा नियंत्रण विभाग**
**केंद्रीय कार्यालय**
**मुंबई – ४०० ००१**

ए. पी. (डी. आय आर सेरीज) परिपत्रक सं. २४

२७ सप्टेंबर २००३

प्रति
विदेशी चलनाचे सर्व अधिकृत विक्रेते / व्यापारी

प्रति महोदया / महोदय,

**परदेशात वास्तव्य करणाऱ्या नजिकच्या नातलगांकडून कर्जाची उभारणी**

दिनांक ३ मे २००० च्या अधिसूचना सं. एफ ई एम ए ३/ २००० - आर बी शिड्यूलच्या पॅराग्राफ (४) चे अवलोकन करावे, ज्याद्वारे खाली नमूद केलेल्या अटींवर भारतात वास्तव्य करणाऱ्या व्यक्तीला, भारतीय रिझर्व्ह बँके आवेदन करुन, परदेशात रहाणाऱ्या जवळच्या नातलगाकडून, यु एस डॉ २,५०,००० पर्यंत, किंवा या रकमे इतके इतर विदेशी मुद्रेत कर्ज उभारण्याची परवानगी दिली आहे.

२)सध्या आस्तित्वात असलेली नियमावली अधिक उदार व सुकर करण्याच्या दृष्टीने रिझर्व्ह बँकेने दिनांक १ नोव्हेंबर २००२ ला अधिसूचना सं. एफ ई एम ए ७५/२००२ - आर बी जारी केले आहेत (प्रतिलिपी संलन्ग) त्यानुसार, भारतात वास्तव्य करणारी व्यक्ती आपल्या परदेशांतील जवळच्या नातलगाकडून यु एस डॉ २,५०,००० मात्र किंवा तेवढ्या किमतीचे कर्ज उभे करु शकते मात्र त्यासाठी खालील गोष्टींची पूर्तता होणे आवश्यक आहे.

अ) कर्जाचा परतफेडीचा काळ कमीत कमी १ वर्ष आहे.
ब) कर्ज व्याजमुक्त आहेः आणि
क) कर्जाची रक्कम मुक्त विदेशी चलनात आवक विप्रेषण द्वारा पाठवली.

स्पष्टीकरण :
“जवळचे नातलग” म्हणजे कंपनीज ऍक्ट १९५६ च्या धारा ६ मध्ये नमूद केलेले नातलग.

३. अधिकृत विक्रेत्यांनी या परिपत्रकाच्या विषयवस्तुशी त्यांच्या संबंधितांना अवगत करावे.
४. या परिपत्रकातील निर्देश हे फेमा १९९९(१९९९ चा ४२ ) च्या धारा १०(४) आणि धारा ११ (१) च्या अंतर्गत जारी केले आहेत.

आपला विश्वासु
ग्रेस कोशी
मुख्य महाव्यवस्थापक